सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


**संदर्भः रासेयो/२०२५–२६/४४४** **तातडीचे व महात्वाचे** **दि.३०/१२/२०२५**

**प्रति,**
**मा. प्राचार्य**
**फक्त पुणे जिल्हा (पुणे शहर व ग्रामीण)**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**संलग्नीत महाविद्यालये व परिसंस्था**

**विषय : बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ – जनजागृती व समन्वय नियोजन बैठकीकरिता उपस्थित राहणेबाबत**

**संदर्भ १: क्र.जिनिसपु/पुणे ग्रँड टूर/२६५६/२०२५, दि. २९/१२/२०२५ रोजीचे मा. जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे पत्र**
**२. क्र.विसस/पुवि/२०२५/बजाज पुणे ग्रँड टूर २०२६/पुणे विभाग/२३०३, दि. ३०/१२/२०२५ रोजीचे पत्र मा. सहसंचालक, (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांचे पत्र**
**३. मा. उपकुलसचिव, शै. विभाग, संलग्नता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे मार्फत सं.क्र.१ चे पत्र दि. २९/१२/२०२५ रोजी अग्रेषीत**
**४. मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे मार्फत सं.क्र. २ चे पत्र दि. ३०/१२/२०२५ रोजी अग्रेषीत**

महोदय/महोदया,

बजाज पुणे ग्रँड टूर–२०२६ ही भारतातील यु.सी.आय. क्लास २.२ आंतरराष्ट्रीय मल्टीस्टेज सायकलिंग स्पर्धा असून, वरील संदर्भीत पत्रान्वये पुणे जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र शासन, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया व बजाज यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ ते २३ जानेवारी, २०२६ कालावधीमध्ये पुणे जिल्ह्यातील ९ तालुक्यांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. सदर आंतरराष्ट्रीय स्पर्धेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे, युवकांचा सहभाग वाढवणे, स्वयंसेवकांची उपलब्धता व सहकार्य प्राप्त करणे या उद्देशाने मा. जिल्हाधिकारी, पुणे यांच्या सुचनेनुसार पुणे जिल्ह्यातील सर्व संलग्न महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी यांची **शुक्रवार, दि. ०२/०१/२०२६ रोजी, दुपारी २.०० वाजता, स्थळ : पर्यावरणशास्त्र सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** याठिकाणी बैठक आयोजित करण्यात आली आहे.

सदर नियोजन बैठकीत स्पर्धेची सविस्तर माहिती, अपेक्षित भूमिका, विद्यार्थी, स्वयंसेवक सहभाग, जनजागृती उपक्रम तसेच आवश्यक समन्वयाबाबत मा. जिल्हाधिकारी, पुणे मार्गदर्शन करणार आहेत. मा. कुलगुरू व मा.प्र–कुलगुरू यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी यांना सदर नियोजन बैठकीकरिता **शुक्रवार, दि. ०२/०१/२०२६ रोजी, दुपारी २.०० वाजता, स्थळ : पर्यावरणशास्त्र सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** याठिकाणी उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे व सदर कालावधीत त्यांची कर्तव्य रजा मंजूर करावी. नियोजन बैठकीकरिता उपस्थित कार्यक्रम अधिकाऱ्यांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**
**राष्ट्रीय सेवा योजना**

**सोबत : जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे पत्र**

महाराष्ट्र शासन
जिल्हा नियोजन समिती
**जिल्हाधिकारी कार्यालय , पुणे**
दूरध्वनी क्र. 020-26121012 Email ID : dpopune85@gmail.com

क्र:जिनिसपु/ पुणे ग्रँड टूर /२६५६/२०२५ दिनांक: २९/१२/२०२५

प्रति,
१. मा.कुलसचिव,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे
२. मा.कुलसचिव,डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे
३. मा.कुलसचिव,गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे
४. मा.कुलसचिव,टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
५. मा.कुलसचिव,भारती विद्यापीठ (Bharati Vidyapeeth Deemed University), पुणे
६. मा.कुलसचिव,सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, पुणे
७. मा.कुलसचिव,अजिंक्य डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटी, पुणे
८. मा.कुलसचिव,डी वाय पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, पुणे
९. मा.कुलसचिव,डी वाय पाटील युनिव्हर्सिटी, आंबी, पुणे
१०. मा.कुलसचिव,डॉ. विश्वनाथ कराड MIT वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे
११. मा.कुलसचिव,फ्लेम युनिव्हर्सिटी, पुणे
१२. मा.कुलसचिव,MIT आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी, लोणीकाळभोर, पुणे
१३. मा.कुलसचिव,स्पायसर ॲडव्हेंटिस्ट युनिव्हर्सिटी, पुणे
१४. मा.कुलसचिव,श्री बालाजी युनिव्हर्सिटी, पुणे
१५. मा.कुलसचिव,सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, पुणे
१६. मा.कुलसचिव,विश्वकर्मा युनिव्हर्सिटी, पुणे

**विषय : "बजाज पुणे ग्रँड टूर २०२६" — जनजागृती व समन्वयासाठी आयोजित बैठकीस विद्यापीठाअंतर्गत सर्व महाविद्यालयांना उपस्थित राहण्याबाबत सूचना देणेबाबत.**
**मंगळवार, दि. ३०/१२/२०२५ दुपारी १.०० वाजता, ५ वा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

महोदय / महोदया,

"बजाज पुणे ग्रँड टूर २०२६" ही भारतातील पहिली UCI Class २.२ आंतरराष्ट्रीय मल्टी-स्टेज सायकलिंग स्पर्धा असून ती पुणे जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र शासन, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (CFI) व बजाज यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत पुणे जिल्ह्यातील ९ तालुक्यांमध्ये आयोजित करण्यात येत आहे.सदर आंतरराष्ट्रीय स्पर्धेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करणे, युवकांचा सहभाग वाढविणे, स्वयंसेवकांची उपलब्धता तसेच NCC / NSS विभागामार्फत आवश्यक सहकार्य प्राप्त करणे या उद्देशाने पुणे जिल्ह्यातील विद्यापीठे व त्याअंतर्गत सर्व संलग्न महाविद्यालये यांच्या सहभागाने संयुक्त बैठक आयोजित करण्यात येत आहे.

सदर बैठकीत स्पर्धेची सविस्तर माहिती, अपेक्षित भूमिका, विद्यार्थी व स्वयंसेवक सहभाग, जनजागृती उपक्रम तसेच आवश्यक समन्वयाबाबत मा.जिल्हाधिकारी, पुणे मार्गदर्शन करणार आहेत. तरी, आपल्या विद्यापीठाअंतर्गत सर्व संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच संबंधित NCC / NSS प्रमुख यांना खालीलप्रमाणे आयोजित बैठकीस उपस्थित राहण्याबाबत सूचना देण्यात याव्यात, अशी विनंती आहे.

**बैठकीचा तपशील : मंगळवार, दि. ३०/१२/२०२५ दुपारी १.०० वाजता**
**स्थळ ५ वा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

तरी, वरीलप्रमाणे आवश्यक निर्देश देऊन सर्व संबधित बैठकीकरिता उपस्थित राहण्याबाबत निर्देश द्यावेत व सर्व निमंत्रितांची यादी या कार्यालयास सादर करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

जिल्हा नियोजन अधिकारी,
जिल्हा नियोजन समिती,पुणे

**प्रत- स्वीय सहायक, मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना माहितीस्तव.**

# महाराष्ट्र शासन

शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, 17 डॉ. आंबेडकर रोड, पुणे-1

फोन नं. ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ E_mail ID- jdhepune@gmail.com

क्रमांक-विसस/पुवि/202५/बजाज पुणे ग्रँड टूर 2026/पुणे विभाग/2303 दिनांक -३०.१२.२०२५

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
2. कुलसचिव, सर्व खाजगी विद्यापीठे, पुणे जिल्हा
२.प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालये,
**<u>पुणे / अहमदनगर व नाशिक जिल्हे.</u>**

**विषय - बजाज पुणे ग्रँड टूर 2026 - जनजागृती व समन्वयासाठी आयोजित बैठकीस पुणे जिल्हयातील सर्व संबं धि त महाविद्यालयांना उपस्थित राहण्याबाबत..**

संदर्भ - मा.जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे यांचे पत्र क्र. जिनिसपु/पुणे ग्रँड टूर/2656/2025 दि. २९.१२.२०२५.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार पुणे जिल्हयातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, **"बजाज पुणे ग्रँड टूर 2026"** ही भारतातील पहिली UCI Class २.२ आंतरराष्ट्रीय मल्टी-स्टेज सायकलिंग स्पर्धा असून ती पुणे जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र शासन, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (CFI) व बजाज यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 19 ते 23 जानेवारी 2026 या कालावधीत पुणे जिल्हयातील 9 तालुक्यांमध्ये आयोजित करण्यात येत आहे. सदर आंतरराष्ट्रीय स्पर्धेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करणे, युवकांचा सहभाग वाढविणे, स्वयंसेवकांची उपलब्धता तसेच NCC/NSS वाग व प्रशिक्षण संस्थांमार्फत आवश्यक सहकार्य् प्राप्त करणे या उद्येशाने पुणे जिल्हयातील उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण व व्यवसाय शिक्षण क्षेत्रातील संस्थांच्या सहभागाने संयुक्त बैठक आयोजित करण्यात येत आहे.

सदर बैठकीत स्पर्धेची सविस्तर माहिती, शैक्षणिक व प्रशिक्षण संस्थांकडून अपेक्त भूमिका, विद्यार्थी व प्रशिक्षणार्थी सहभाग, स्वयंसेवक व्यवस्थापन, जनजागृती उपक्रम तसेच आवश्यक समसन्वयाबाबत मा. जिल्हाधिकारी, पुणे हे मार्गदर्शन करणार आहेत, तरी सदर बैठकीस सर्व विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालयाचे प्राचार्य, NCC/NSS अधिकारी / समन्वयक यांनी खालील ठिकाणी व वेळेत बैठकीस उप स्थित रहावे.

**बैठकीचा तपशील - मंगळवार, दिनांक ३०.१२.२०२५ दुपारी १.०० वाजता**
**स्थळ - 5 वा मजला, मा. जिल्हिकारी कार्यालय, पूणे**

(डॉ. अशोक उबाळे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

सोबत - वरीलप्रमाणे परिपत्रक.
प्रत - मा. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, पुणे

महाराष्ट्र शासन
जिल्हा नियोजन समिती
# जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र. 020-26121012 Email ID : dpopune85@gmail.com

क्र:जिनिसपु/ पुणे ग्रँड टूर /२६५६/२०२५ दिनांक: २९/१२/२०२५

प्रति,

१. **सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे**
२. **सहसंचालक, तंत्र शिक्षण पुणे विभाग, पुणे**
३. **जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पुणे**

**विषय : "बजाज पुणे ग्रँड टूर २०२६" — जनजागृती व समन्वयासाठी आयोजित बैठकीस पुणे जिल्ह्यातील सर्व संबधित संस्थाना उपस्थित राहण्याबाबत सूचना देण्याबाबत.**
**मंगळवार, दि. ३०/१२/२०२५ दुपारी १.०० वाजता, ५ वा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**महोदय,**

"बजाज पुणे ग्रँड टूर २०२६" ही भारतातील पहिली UCI Class २.२ आंतरराष्ट्रीय मल्टी-स्टेज सायकलिंग स्पर्धा असून ती पुणे जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र शासन, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (CFI) व बजाज यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत पुणे जिल्ह्यातील ९ तालुक्यांमध्ये आयोजित करण्यात येत आहे.सदर आंतरराष्ट्रीय स्पर्धेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करणे, युवकांचा सहभाग वाढविणे, स्वयंसेवकांची उपलब्धता तसेच NCC / NSS विभाग व प्रशिक्षण संस्थांमार्फत आवश्यक सहकार्य प्राप्त करणे या उद्देशाने पुणे जिल्ह्यातील उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण व व्यवसाय शिक्षण क्षेत्रातील संस्थांच्या सहभागाने संयुक्त बैठक आयोजित करण्यात येत आहे.

सदर बैठकीत स्पर्धेची सविस्तर माहिती, शैक्षणिक व प्रशिक्षण संस्थांकडून अपेक्षित भूमिका, विद्यार्थी व प्रशिक्षणार्थी सहभाग, स्वयंसेवक व्यवस्थापन, जनजागृती उपक्रम तसेच आवश्यक समन्वयाबाबत मा.जिल्हाधिकारी, पुणे मार्गदर्शन करणार आहेत. तरी, आपल्या कार्यालयाच्या अखत्यारितील सर्व विद्यापीठे, संलग्न महाविद्यालये, तंत्र शिक्षण संस्था तसेच सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) यांचे प्राचार्य / प्रमुख व संबंधित NCC / NSS अधिकारी / समन्वयक यांना खालीलप्रमाणे आयोजित बैठकीस उपस्थित राहण्याबाबत आपल्या कार्यालयामार्फत सर्व संबंधित संस्थांना तात्काळ सूचना देण्यात याव्यात, अशी विनंती आहे..

**बैठकीचा तपशील : मंगळवार, दि. ३०/१२/२०२५ दुपारी १.०० वाजता**
**स्थळ ५ वा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

तरी, वरीलप्रमाणे आवश्यक निर्देश देऊन अधिनस्त सर्व महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना बैठकीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे तसेच सूचना देण्यात आलेल्या संस्थांची यादी या कार्यालयास सादर करण्यात यावी, ही नम्र विनंती.

आपला,

[signature]

**जिल्हा नियोजन अधिकारी,**
**जिल्हा नियोजन समिती,पुणे**

**प्रत- स्वीय सहायक, मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना माहितीस्तव.**